
ISSN 2277- 8063 (Print)




# Navjyot
# नवज्योत

## INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

**(Science, Humanities, Social Sciences, Languages, Commerce & Management )**

A Quarterly, High Impact Factor, Peer Reviewed, Referred & Indexed Journal

ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE
Reg.No. 2/12883
Estd. June - 1998
Tal.Gadhinglaj. Dist.Kolhapur.
GADHINGLAJ



www.navjyot.net
E-mail : editornavjyot@gmail.com

LIBRARY GADHINGLAJ



| | | | | |
|---|---|---|---|---|
| 44. | History | JRD Tata a Visionary Nation Builder | Waghmare Kabirdas Sudam | 170-174 |
| 45. | इतिहास | महाराष्ट्रातील चळवळीच्या इतिहास अनूषंगाने हैद्राबाद मूक्तीसंग्रमात मराठवाड्याचे योगदान | शिवाजी काशीनाथ गायकवाड | 175-177 |
| 46. | राज्यशास्त्र | स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महाराष्ट्रामधील सामाजिक चळवळीचे नेतृत्व: एक अभ्यास | संजय बाळगोंडा खोत | 178-181 |
| 47. | राज्यशास्त्र | महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ आणि शेतकरी संघटनेतील गटबाजीचे राजकारण | प्रा. डॉ. संजय सागरु सपकाळ | 182-185 |
| 48. | इतिहास | श्री बापू तुकाराम गुरव : एक अपरिचित स्वातंत्र्यसैनिक | श्री. संदीप बळवंत गुरव | 186-189 |
| 49. | इतिहास | वसतिगृह चळवळीपाठीमागील छत्रपती शाहू महाराजांची भूमिका | श्री.संदिप वसंतराव जाधव | 190-194 |
| 50. | इतिहास | पर्यावरण चळवळीचे भारतीय आयाम व महात्मा गांधीजींच्या पर्यावरण विषयक विचारांची उपयुक्तता | समाधान आबा जाधव | 195-199 |
| 51. | इतिहास | तात्यासाहेब कोरे यांचे वारणा खोऱ्यातील सहकार चळवळीला लाभलेले योगदान | सौरभ राजेश झेंडे | 200-203 |
| 52. | इतिहास | समाज सुधारणेत सावित्रीबाई फुले यांचे योगदान | डॉ.हणमंत बाळकृष्ण नागणे | 204-206 |
| 53. | History | Role of Naval Central Strike Committee during RIN Mutiny 1946 | Mr. Somanath Satapute | 207-212 |
| 54. | History | Thoughts of Dr. Babasaheb Ambedkar and Challeges in The Implementation of Fundamental Rights | Harshal Shashikant Shinge | 213-219 |
| 55. | Economics | Economic Ideas of Mahatma Gandhi in Relevance of Globalization | Dr. Dnyanraja Chighalikar | 220-222 |
| 56. | राज्यशास्त्र | 1991 च्या मुक्त अर्थव्यवस्थेचे राजकीय क्षेत्रावर झालेला परिणाम | शरद विठ्ठल पाटील | 223-225 |
| 57. | राज्यशास्त्र | 1991 च्या मुक्त अर्थव्यवस्थेचे अनुसूचित जातीच्या चळवळीवरील राजकीय परिणाम | उषादेवी अंकुश कांबळे | 226-228 |
| 58. | राज्यशास्त्र | 1991 च्या नवीन आर्थिक धोरणाचे भारतातील निवडक राष्ट्रीय राजकीय पक्षाच्या धोरणावरील परिणाम | श्री राजेंद्र शरद जायकर<br>डॉ. टी. एम. पाटील | 229-234 |
| 59. | इतिहास | जागतिकीकरण व पर्यटन : एक चिकित्सा | डॉ. सुरेश मारुती चव्हाण<br>प्रा. प्रशांत प्रकाश कांबळे | 235-237 |
| 60. | Library & Inf science | जागतिकीकरणात महाविद्यालयीन ग्रंथपालाची बदलती भूमिका | समीर श्रीहरी कुलकर्णी | 238-241 |
| 61. | वाणिज्य | महात्मा गांधी : शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय विचार | प्रा. सचिन सोमगोंडा पाटील<br>प्रतीक्षा पुंडलिक दुंडगे | 242-244 |
| 62. | अर्थशास्त्र | 1991 च्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणाचे आर्थिक परिणाम | अश्विनी विपुल पाटील<br>शुभांगी वसंत ठोंबरे | 245-248 |
| 63. | राज्यशास्त्र | महिलांचे राजकारण विशेष संदर्भ कराड महानगरपालिका | तृप्ती रमेश मोरे | 249-252 |
| 64. | राज्यशास्त्र | भारतीय राजकारणाचे आघाड्यांच्या राज्यकारणाकडून बहुमताकडे वाटचाल: स्थिती आणि वास्तव | प्रा. डॉ. विक्रमराव नारायणराव पाटील | 253-257 |



ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE Reg.No. 2/12883 Estd. June - 1996 Tal.Gadhinglaj, Dist.Kolhapur. GADHINGLAJ

(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / VOL. XII / Issue- II ISSN 2277-8063

# 1991 च्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणाचे आर्थिक परिणाम

**अश्विनी विपुल पाटील** सहाय्यक प्राध्यापक- वाणिज्य विभाग कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज

**शुभांगी वसंतराव ठोंबरे** सहाय्यक प्राध्यापक-वाणिज्य विभाग कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज

## प्रास्ताविक

शेकडो वर्षाच्या पारतंत्र्यानंतर भारताने समाजवादी अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून आपली वाटचाल सुरू केली. अमेरिका व पाश्चात्त्य देशांशी चांगले संबंध प्रस्थापित न झाल्याने भारताला व्यापारासाठी सोवियत रशियावर अवलंबून राहावं लागले. 1980 नंतर सोवियत दुभंगण्याची प्रक्रिया सुरू झाली ,आणि 1991 मध्ये पंधरा देशात विभाजन झाले. याचा परिणाम भारताच्या निर्यातीवर झाला व भारतीय व्यापार संकटात आला. याच दरम्यान अमेरिकेने 1991 मध्ये इराकविरुद्ध युद्ध पुकारले. या युद्धाचा परिणाम म्हणजे जगातील तेल साठ्यातील पुरवठ्यावर झाला. त्यावेळी कच्च्या तेलाच्या आयातीसाठी भारताला मोठी किंमत मोजावी लागली. परिणामी परकीय गंगाजळी कमी राजकीय परिस्थिती सुद्धा अस्थिर झाले. गुंतवणूकदारांचा विश्वास कमी झाला आणि देशात विदेशी गुंतवणूक येणे कमी झाले.

भारतीय अर्थव्यवस्था आर्थिक संकटात सापडली होती. विदेशी चलन साठा खूपच कमी झाला होता. चलनवाढ प्रचंड प्रमाणात वाढली होती. संरक्षण
व्यवस्था, अनुदान, कर्जावरचे व्याज इत्यादी वरचा सरकारचा खर्च महसुलापेक्षा जास्त वाढला होता. यातून बाहेर पडण्यासाठी सरकारला कर्ज घेणे भाग पडू लागले. 1990- 91 मध्ये ही कर्जाचे प्रमाण 53% पर्यंत पोहोचले. विदेशी कर्ज 70 अब्ज डॉलर्स पर्यंत पोहोचले. 290 अब्ज डॉलर्स जीडीपी असणाऱ्या भारताला 70 अब्ज डॉलर्स कर्ज हा एक मोठा बोजा होता. याच दरम्यान 3 जुलै 1991 मध्ये रुपयाचे दोन टप्प्यांमध्ये अवमूल्यन करण्यात आले.

आजच्या तरुण पिढीला हे वाचून कदाचित आश्चर्य वाटेल की, 1991 पूर्वी स्कूटर म्हणजे बजाज , बूट म्हणजे बाटा , चार चाकी गाडी म्हणजे प्रीमियर पद्मिनी, दूध म्हणजे सरकारी योजनेच्या काचेच्या बाटलीत विविध रंगीत बुचाचे झाकण असलेले, बँका म्हणजे सरकारी किंवा सहकारी बँका, विमा म्हणजे एलआयसी, विमान सेवा म्हणजे एअर इंडिया, टीव्ही म्हणजे दूरदर्शन, रेडिओ म्हणजे ऑल इंडिया रेडिओ म्हणजे आकाशवाणी या गोष्टींना कोणताच पर्याय उपलब्ध नव्हता.

## विषयाची निवड

30 वर्षांपूर्वी 24 जुलै 1991 मध्ये उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या त्रिसूत्रीचा देशाच्या विकासासाठी अवलंब करण्यात आला. या घटकांच्या आधारे देशाचा झालेला विकास अभ्यासण्यासाठी, आर्थिक विकासातील योगदान समजून घेण्यासाठी ,देशाच्या शेती, उद्योग व सेवा क्षेत्रामध्ये झालेल्या बदलाचा अभ्यास करण्यासाठी व तसेच त्यांचे फायदे तोटे यांचा आढावा घेण्यासाठी प्रस्तुत शोधनिबंध विषयाची निवड करण्यात आली आहे.

## 1991 च्या आर्थिक धोरणाची उद्दिष्टे

1) भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण करणे,
2) अर्थव्यवस्थेत स्थैर्य प्राप्त करून देणे व व्यवस्थेत संरचनात्मक बदल घडवून आणणे.
3) आंतरराष्ट्रीय व्यवहार तोल सांभाळणे.
4) विदेशी चलन साठा वाढवणे.
5) चलनवाढीचा दर कमी करणे.
6) उच्च आर्थिक वृद्धीदर प्राप्त करणे.



ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE Reg. No. 2/12883 Estd. June - 1998 Tal.Gadhinglaj, Dist.Kolhapur. GADHINGLAJ

2) खाजगीकरण ,उदारीकरण व जागतिकीकरणामुळे बेकारीचे प्रमाण वाढू लागले .
3) जागतिकीकरणामुळे आयातीवरील कर रद्द झाल्यामुळे राष्ट्राच्या उत्पन्नात घट होऊ लागली .
4) जागतिकीकरणामुळे अनियंत्रित स्पर्धा वाढवून स्थानिक लहान उद्योगांचे हानी होऊ लागली.
5) जागतिकीकरणामुळे जगात श्रीमंत व गरीब देश अशी विषमतानिर्माण होऊ लागली.

**सारांश**

अशाप्रकारे 1991 च्या आर्थिक धोरणानुसार उदारीकरण खाजगीकरण व जागतिकीकरण या त्रिसूत्रीचा अवलंब करण्यात आला आणि देशाच्या विकासामध्ये हातभार लागला. या घटकांच्या आधारे प्रत्येक राष्ट्राची आणि राष्ट्रातील उद्योगांची स्पर्धा वाढीस लागली.

जगात चालणाऱ्या संशोधन व विकासाचा लाभ सर्वच राष्ट्रांना त्वरित मिळू लागला त्यामुळे प्रत्येक राष्ट्रातील कार्यक्षमता आणि उत्पादकता यामध्ये जलदवाढ होऊ लागले. शासकीय गुंतवणूक कमी करून नव्या धोरणांमध्ये खाजगीकरणाला प्राधान्य देण्यासाठी आणि जागतिकीकरण साध्य करण्यासाठी उदारीकरणाची दिशा देणे अशा प्रकारे 1991 चे धोरण हे विकासाला एक नवी दिशा देणारे असे ठरले.

**संदर्भ ग्रंथ**

- 1991 चे नवे आर्थिक धोरण - महाराष्ट्र टाइम्स
- पुढारी न्युज – ई- पेपर - 2021
- भारतीय अर्थव्यवस्था - रंजन कोळंबे भारतीय
- अर्थव्यवस्था- विकिपीडिया

ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE Reg.No. 2/12883 Estd. June - 1998 Tal.Gadhinglaj, Dist.Kolhapur. GADHINGLAJ



I/C. PRINCIPAL
Arts, Commerce & Science College
Gadhinglaj, Dist. Kolhapur.